# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
# वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- 17.02.2026** **वार- मंगळवार**

---

**<u>रक्षाखडसे</u>**

राष्ट्रीय सेवा योजनेतून घडणारा विद्यार्थी भविष्यात देशाला प्रगतीपथावर नेतो . पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी पाहिलेले विकसित भारताचे स्वप्न अशा युवाशक्तीच्या आधारानेच साध्य होणार आहे ,असा विश्वास केंद्रीय युवा आणि क्रीडा राज्यमंत्री रक्षा खडसे यांनी आज पुण्यात व्यक्त केला.सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या विद्यार्थ्यांच्या  राष्ट्रीय एकात्मता शिबिराचा समारोप आज त्यांच्या उपस्थितीत आज पार पडला. यावेळी पुणे विद्यापीठाचे कुलगुरू डॉक्टर सुरेश गोसावी, प्र कुलगुरू डॉक्टर पराग काळकर, महाराष्ट्र आणि गोव्याचे राष्ट्रीय सेवा योजनेचे संचालक अजय शिंदे उपस्थित होते. या शिबिरात बारा राज्यातले 195 विद्यार्थी सहभागी झाले होते.

**<u>विमानकॉकपीटवाईसरेकॉर्डर</u>**

बारामतीजवळ महिन्यापूर्वी कोसळलेल्या लिअरजेट 45 विमानाच्या कॉकपीट वाईस रेकॉर्डरमधला डेटा मिळवण्यासाठी , रेकॉर्डरच्या निर्मात्या कंपनीकडून विशेष सहाय्य मागवलं असल्याचं विमान अपघात तपास कार्यालय अर्थात A A I B ने म्हटलं आहे. या विमानातले दोन्ही  रेकॉर्डर दुर्घटनेपूर्वी बराच काळ तीव्र तापमानात राहिल्याचं A A I B ने म्हटलं आहे. या अपघातात राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांचा मृत्यू झाला होता.

**<u>ऊसतोडकामगार</u>**

स्थलांतरित ऊसतोड कामगारांच्या सर्वांगीण विकासासाठी महाराष्ट्रात एक नवीन पथदर्शी आणि नाविन्यपूर्ण प्रकल्प राबवण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय काल पुण्यात झालेल्या राज्यस्तरीय गोलमेज परिषदेत घेण्यात आला. ऊसतोड हंगामासाठी दरवर्षी जिल्ह्याबाहेर स्थलांतर करणाऱ्या हंगामी कामगारांना शासन आणि संस्थांची अस्तित्वातील धोरणे आणि कल्याणकारी योजनांचे लाभ, प्रत्यक्ष क्षेत्रीय स्तरावर मिळवून देणे, हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश आहे. या चर्चेत स्थलांतरित ऊसतोड कामगारांना आरोग्य सेवा, शिक्षण आणि कल्याणकारी योजनांचा लाभ मिळवून देण्यातील अडचणींवर लक्ष केंद्रित करण्यात आले.

**<u>एफआरपीगुन्हा</u>**

शेतकऱ्यांना 14 दिवसांत उसाची एफआरपीची रक्कम न दिल्यास संबंधित साखर कारखान्यांवर तत्काळ फौजदारी गुन्हा दाखल करून परवाना निलंबनाची कारवाई करावी, यासह अन्य मागण्या शरद जोशी विचार मंच शेतकरी संघटनेचे अध्यक्ष विठ्ठल पवार यांनी केल्या आहेत. सर्व व्यवहार डिजिटल आणि पारदर्शक करणे बंधनकारक करावे. शेतकरी आत्महत्या प्रतिबंधासाठी स्वतंत्र न्यायिक आयोग उभरावा तसंच या मागण्यांवर शासनानं एक महिन्याच्या आत ठोस निर्णय जाहीर करावा. अन्यथा, शेतकरी संघटना देशव्यापी निर्णायक आंदोलन उभारेल, असा इशारा त्यांनी निवेदनाद्वारे दिला आहे.

**<u>स्थायीसमितीनिवडणुक</u>**

पुणे महापालिकेच्या स्थायी समितीच्या अध्यक्षपदाची निवडणूक येत्या सोमवारी २३ तारखेला होणार आहे. त्यासाठी स्थायी समितीतर्फे  विशेष सभेचे आयोजन करण्यात आले आहे. या निवडणुकीसाठी पीठासीन अधिकारी झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाचे मुख्य कार्यकारी अधिकारी सतीशकुमार खडके यांची नियुक्ती केली आहे.

**<u>शहीदमहोत्सवपुण्यातचित्ररथस्वागत</u>**

गुरु तेग बहादुर यांच्या ३५० व्या शहीद महोत्सवानिमित्त त्यांच्या जीवनचरित्रावर आधारित चित्ररथाचं काल सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ परिसरात उत्स्फूर्त स्वागत करण्यात आलं. हा चित्ररथ पाषाणमध्ये दाखल झाला असून त्यानिमित्त विविध ठिकाणी चित्ररथासमोर धार्मिक आणि प्रेरणादायी कार्यक्रमांचं आयोजन करण्यात आलं होतं. परिसरातल्या चौकांमध्ये रथ लावून 'हिंद दी चादर ' कार्यक्रमाच्या अनुषंगानं जनजागृती करण्यात आली.

**<u>सेवामहोत्सव</u>**

संयुक्त राष्ट्र संघानं २०२६ हे वर्ष आंतरराष्ट्रीय स्वयंसेवी संघ वर्ष म्हणून घोषित केल्याच्या पार्श्वभूमीवर सेवा सहयोग फाउंडेशननं पुण्यात सेवा महोत्सव -उत्सव सेवेचा या कार्यक्रमाचं आयोजन केलं होतं. विविध सेवा क्षेत्रात कार्यरत असलेल्या मान्यवरांनी यावेळी आपली प्रेरणादायी मनोगतं व्यक्त केली. समुत्कर्ष प्रकल्पांतर्गत लाभार्थी विद्यार्थ्यांनी सृजनशील सादरीकरण केलं. सेवा- फेस्ट हा केवळ एक कार्यक्रम नसून, समाजातल्या माणसांना माणसांशी जोडणारी आणि स्वयंसेवेची प्रेरणा देणारी सशक्त चळवळ ठरल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली.

**<u>प्रशासकीयअधिकारीमराठीसाहित्यसंमेलन</u>**

प्रशासकीय अधिकाऱ्यांसाठी दुसरे मराठी साहित्य संमेलन पुण्यात येत्या २१ आणि २२ फेब्रुवारी आयोजित करण्यात आलं आहे. तेलंगणचे अतिरिक्त पोलिस महासंचालक महेश भागवत संमेलनाचे अध्यक्ष असून पुणे महापालिकेचे आयुक्त नवल किशोर राम स्वागताध्यक्ष आहेत. संमेलनात शासकीय अधिकाऱ्यांच्या उत्कृष्ट साहित्यकृतीला वाङ्मय पुरस्कार देऊन गौरविले जाणार आहे.तसंच विविध विषयांवर परिसंवाद आणि मुलाखती होणार आहेत.

**<u>हवामान</u>**

पुणे आणि परिसरात आज आकाश निरभ्र असून कमाल तापमान ३४ तर किमान तापमान १८ पूर्णांक ४ अंश सेल्सिअस नोंदवण्यात आलं. उद्या किमान तापमानात काहीशी घट होण्याची शक्यता हवामान विभागांनं वर्तवली आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार!**